अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## २००४ च्या लूकमध्ये धोनी आयपीएल खेळणार



चेन्नई : आयपीएलच्या १७ व्या हंगामाचा थरार दोन आठवड्यानंतर सुरु होणार आहे. २२ मार्चपासून आयपीएल स्पर्धेचा रनसंग्राम सुरु होणार आहे. धोनीच्या चेन्नईमध्ये आणि विराट कोहलीच्या आरसीबी या संघाध्ये सलामीची मोठी लढत होणार आहे.

आयपीएलसाठी एमएस धोनीने चेन्नईमध्ये कसून सराव सुरु केला आहे. धोनीच्या सरावाचे फोटो चेन्नईने सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत.

चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार धोनीनं चेपॉकवरील सराव शिबिरात भाग घेतला. यावेळी तो नेटमध्ये जुन्या लूकमध्ये दिसला. धोनीनं २००४ मध्ये जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं तेव्हा त्याचा लांब केसांचा लूक खूपच लोकप्रिय झाला होता.

आगामी आयपीएलमध्ये धोनी पुन्हा एकदा त्याच लूकमध्ये दिसणार आहे. नेटमध्ये सराव करताना लांब केसांच्या धोनीनं खूप घाम गाळला. सीएसकेकडून आयपीएलसाठी प्री-सीजन ट्रेनिंग कॅम्पची सुरुवात करण्यात आली आहे. चेन्नईच्या संघातील काही खेळाडू कॅम्पमध्ये दाखल झाले. त्यामध्ये दीपक चाहर, ऋतुराज गायकवाड, सिमरजीत सिंह, राजवर्धन हंगरगेकर, मुकेश चौधरी, प्रशांत सोलंकी, अजय मंडल, शेख रशीद आणि निशांत सिंधू यांच्या नावाचा समावेश होता. चेन्नईच्या चमूसोबत धोनीही दाखल झालाय. चेन्नई २०२४ च्या आयपीएल हंगामाची सुरुवात २२ मार्चपासून करणार आहे.

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १३ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १६४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



# माळशिरस तालुक्याच्या समृध्दीसाठी ९८८ कोटींची हरितक्रांती

● दोन दिवसात निघणार निविदा

## निरा देवघरच्या फलटण-माळशिरस योजनेची निविदा काढण्याला राज्य सरकारची अखेर मंजूरी

फलटण, सोलापूर/प्रतिनिधी

**साधारण ९८८ कोटींच्या खर्चातून निरा देवघर प्रकल्पांतर्गत माळशिरस तालुक्यात हरितक्रांतीच्या समृध्दीची पहाट उगणवणार आहे. निरा देवघर योजनेचे पाणी माळशिरस तालुक्यातील कारुंडेसह अन्य गावांना देण्याच्या फलटण ते माळशिरस कॅनॉल उभारणीच्या कामाची निविदा काढण्याला आज मंगळवारी ( ता.१३) राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. निरा देवघर योजनेचे पाणी फलटणसह माळशिरस तालुक्याला देण्याच्या योजनेला या मंजूरीमुळे मुर्त स्वरुप येणार आहे.**

राज्याचे अवर सचिव संदीप भालेराव यांच्या स्वाक्षरींने या संदर्भातील आदेश काढण्यात आले आहेत. निरा देवघर प्रकल्पाचा उजवा कालवा कि.मी.८७ ते १३५ पर्यंतच्या कामांचा यामध्ये समावेश आहे. या मंजूर निधींतून फलटण ते माळशिरस या दरम्यानच्या कॅनॉलचे काम (पान ६ वर)



फलटण : फलटण-बारामती रेल्वे मार्गावरील विविध कामांच्या उद्घाटनावेळी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर व अन्य.


### फलटण-पंढरपूर रेल्वे प्रकल्पाच्या निविदेसाठी जोरसे प्रयत्न

फलटझ ते पंढरपूर हा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षीत प्रकल्पाचे टेंडर आचारसंहितेपूर्वी काढण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु आहेत. केंद्र सरकारच्या कॅबिनेटसमोर हा विषय आहे. येथे या विषयाला मंजूरी मिळाली की या प्रकल्पाची निविदा काढण्याचा मार्ग मोकळा होईल, १५ मार्चपर्यंत हे काम पूर्ण करू, असा, विश्वास असल्याचे खासदार रणजितसिंह -नाईक -निंबाळकर यांनी सांगितले.

### फलटण-बारामती रेल्वे प्रकल्प कामांचे उद्घाटन

बहुचर्चित फलटण ते बारामती या रेल्वे मार्गावरील १५०० कोटी रुपयांच्या कामांचे उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मंगळवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. खासदार नाईक-निंबाळकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती यावेळी होती. या प्रकल्पामुळे दुष्काळी फलटण, माण या भागातील शेतकऱ्यांना शेती उत्पादनांच्या वाहतुकीसाठी मोठा लाभ होणार आहे. तसेच प्रवाशांची ही सोय होणार आहे.


माळशिरस तालुक्याच्या सर्वदूर भागात निरा देवघर योजनेचे पाणी आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी ९८८ कोटींच्या योजनेला आजच मंजुरी दिली आहे. निरा देवघरचे पाणी फलटणपर्यंतच आणले. माळशिरस तालुक्याचे काय? याबद्दल माझ्या टीका झाली होती. तथापि, माळशिरससाठीच्या या योजनेचे टेंडर काढ्यात मी यशस्वी झालो. आमदार राम सातपुते, मोहिते-पाटील परिवार, उत्तम जानकर यांच्यासह ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद. या योजनेसाठीच्या शुभेच्छा. परमेश्वराची कृपा, भाजपाचे माझ्यावर असलेले प्रेम, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सर्व मंत्रिमंडळ यांचे प्रेम यामुळे मी दिलेला शब्द पूर्ण करु शकलो. सर्व कृष्णा खोरे महामंडळाचे सहकारी अधिकारी, मंत्रालयातील सचिव, अधिकारी यांना धन्यवाद. फलटण-पंढरपूर आणि निरा देवघर या दोन्ही प्रकल्प अंतीम टप्यात आणले आहेत.



**- रणजितसिंह नाईक-निंबाळकर, खासदार माढा**

## सोलापूर शहरासाठी उजनीतून भीमेत ६ हजार क्यूसेक्सने विसर्ग

टेंभूर्णी/प्रतिनिधी



सोलापूर शहराला पिण्यासाठी केवळ दहा दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा औज आणि चिंचपूर बंधाऱ्यात शिल्लक असल्यामुळे उजनी धरणातून भीमा नदीत तातडीने पाणी सोडण्यात यावे अशा मागणी आशयाचे पत्र सोलापूर पालिका आयुक्तांच्या वतीने मिळाल्यामुळे उजनी धरणातून सोलापूर शहराला पिण्यासाठी पाणी कमी पडू नये म्हणून ११ मार्च रात्री १० वाजलेपासून धरणाच्या चार दरवाज्यातून दीड हजार क्यूसेक्स पाणी सोडण्यास प्रारंभ केला आहे.

त्यात सकाळपर्यंत वाढ करुन तो विसर्ग ६००० क्युसेक करण्यात आला आहे. हे पाणी २३२ किलोमीटर प्रवाही अंतर पार करून औज आणि चिंचपूर बंधाऱ्यात २० मार्चपर्यंत पोहोचेल व २१ पासून धरणातून पाणी सोडणे बंद करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा सोलापूर विभागाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली आहे. या पाण्यामुळे पंढरपूर सांगोला मंगळवेढा आदी शहरासहित भीमा नदी काठावरील शेकडो गावे व वाड्यावस्त्यांना ऐन कडक उन्हाळ्यात पिण्यासाठी व शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या भीमा नदीतील (पान ६ वर)


## माढ्यातून चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी?

### राज्यातील सहा मंत्र्यांना लोकसभेला पाठवण्याची योजना; त्यात पालकमंत्र्यांचा समावेश

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्यातील सहा मंत्र्यांना भारतीय जनता पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याच्या विचारात आहे. त्यात चंद्रकांत पाटील यांच्या नावाचा समावेश आहे. भाजपाचे माजी राष्ट्रीय सरचिटणीस आणि पंतप्रधानांचे निकटवर्तीय सुनील देवधर यांना किंवा माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना पुण्याची उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्यामुळे चंद्रकांत पाटील यांना माढ्यातून उमेदवारी देण्याची शक्यता भाजपच्या अंतरस्थ वर्तुळात व्यक्त होत आहे.

पाटील यांना पुण्यात असणारा विरोध, त्यानंतर कसबा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत झालेला पराभवालाही चंद्रकांत पाटील यांचे नेतृत्व आणि वक्तव्य कारणीभूत असल्याचे भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे मत झाल्याची चर्चा भाजपच्या प्रदेश पातळीवरील नेत्यांमध्ये आहे. माढा मतदार संघात विद्यमान खासदारांनी केलेली विकास कामे ही त्या मतदारसंघात भाजपासाठी जमेची बाजू आहे. त्यांची उमेदवारी माढ्यात निश्चित मानली जात आहे. त्यातच चंद्रकांत पाटील यांचे नाव संभाव्य उमेदवारांच्या यादीत असल्याचे भारतीय जनता पक्षाच्या वरीष्ठ पातळीवर चर्चा सुरू झाली. त्यामुळे चंद्रकांत पाटील माढा मतदारसंघातून उमेदवारी मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात होऊ लागली.



#### मोहिते-पाटील यांचा आग्रह

माढ्यातून मोहिते पाटील उमेदवारीसाठी इच्छूक आहेत. पक्ष निरीक्षकांसमोर त्यांनी शक्ती प्रदर्शन केले. उमेदवारी न दिल्यास नाराज झालेला मोहिते पाटील गट वेगळी भूमिका घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर आपल्या विकास कामांतून जनतेच्या मनात घर केलेल्या रामराजे नाईक-निंबाळकरांना डावलल्यास मोठा जनक्षोभ होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत ज्येष्ठ नेत्याला उमेदवारी दिल्यास पक्षांतर्गत संघर्ष थांबवता येऊ शकतो, अशी शक्यता सूत्रांनी व्यक्त केली.

#### अभावीपमुळे संपर्क

अखील भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करत असताना चंद्रकांत पाटील यांनी सोलापूर जिल्हयात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. त्यामुळे या मतदारसंघात त्यांचा व्यक्तीगत संपर्क आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता भाजपच्या सूत्रांनी व्यक्त केली.

## मराठा आरक्षण कायद्याला तातडीच्या स्थगितीस नकार

मुंबई/प्रतिनिधी

मराठा आरक्षण कायद्याला तातडीची स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला. हा विधिमंडळात झालेला कायदा आहे, हे लक्षात घेऊन राज्य सरकार आणि कायद्याचा लाभ मिळणाऱ्या हस्तक्षेप अर्जदारांना उत्तर देण्याची संधी दिल्याविना स्थगिती आदेश देता येणार नाही, त्याऐवजी आधीच्या अंतरिम आदेशाने हितरक्षण होत आहे, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.



मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या व शिक्षण प्रवेशांत दहा टक्के आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने नव्याने केलेल्या कायद्याविरोधात जयश्री पाटील, गुणरत्न सदावर्ते, शंकर लिंगे व राजाराम पाटील या चौघांनी केलेल्या जनहित याचिकेसह अनेक याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी झाली. महाराष्ट्र राज्य सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास समाज कायदा, २०२४ हा मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या व शिक्षण प्रवेशांत दहा टक्के आरक्षण देणारा नवा कायदा राज्य सरकारने केला आहे. त्या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. या याचिकांवरील सुनावणीदरम्यान मराठा आरक्षण कायद्याला तातडीची स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला.

सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण उपलब्ध करणाऱ्या कायद्याचे जे काही लाभ असतील ते उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशाच्या अधीन असतील, हा ८ मार्च रोजीचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे, असे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने आपल्या आदेशात स्पष्ट केले. राज्य सरकारला दोन आठवड्यांत सविस्तर उत्तर दाखल करण्याचे निर्देश देऊन खंडपीठाने त्यानंतर एक आठवड्यात (पान ६ वर)

## राहुल गांधींची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात

▸ नंदुरबारमधून आदिवासींसाठी केल्या पाच मोठ्या घोषणा

नंदूरबार/प्रतिनिधी

आदिवासींचे जमिनीवरील दाव्याचे प्रश्न सोडवणे, वनजमिनींचे भूसंपादन कायदा पुन्हा मजबूत बनवू, जंगलातील पिकांना आणि उत्पादनांना हमीभाव तसेच गावागात आदिवासींचे स्वायत्त सरकार अशी कामे सत्तेवर आल्यास वर्षाच्या आत पूर्ण करण्याची गॅरंटी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिली.



राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचे मंगळवारी नंदूरबार येथे आगमन झाले. यात्रेचे आधिवासी बांधवांनी जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर झालेल्या सभेत राहुल गांधी बोलत होते. काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि वायनाडचे (केरळ) खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा मंगळवारी महाराष्ट्रात दाखल झाली आहे. या पदयात्रेचा राज्यातला पहिला थांबा (पान ६ वर)

#### १४ वर्षांनंतर नंदुरबारमध्ये

ज्या नंदुरबार जिल्ह्यावर गांधी घराण्याचे विशेष प्रेम राहिले आहे, त्या नंदुरबारकडे २०१० नंतर गांधी घराण्याचा एकही सदस्य फिरकला नाही. त्यामुळेच की काय तब्बल १४ वर्षांनंतर राहुल गांधी भारत जोडो न्याय यात्रेच्या माध्यमातून नंदुरबारमध्ये आल्याने स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांमध्ये उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



यामध्ये 'संशयाचाच' धूर जास्त आहे !

कल्याण
480-27-458

मुंबई
245-15-690

## १५ मार्चपासून श्री विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन बंद

### सकाळी पाच ते अकरा दरम्यान चालू राहणार मुखदर्शन; नित्योचारामध्ये कुठलाही खंड नाही

पंढरपूर/प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल आणि रुक्मिणीमातेचे पदस्पर्श दर्शन येत्या १५ मार्च पासून बंद राहणार असून भाविक भक्तांना वारकऱ्यांना रोज सकाळी ५ ते ११ या कालावधीत फक्त मुख दर्शन घेता येणार आहे. या शिवाय मंदिराच्या बाहेर लावलेल्या मोठ्या स्क्रीनवर श्री विठ्ठल रुक्मिणीचे देवाचे दर्शन घेता येईल. पंढरपुरात भरणाऱ्या आषाढी वारी पूर्वी गाभाऱ्यातील सर्व कामे पूर्ण होतील, अशी माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद आणि मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. दरम्यान या मंदिर संवर्धन कामाच्या वेळेस देवाच्या सर्व नित्योपचारांमध्ये कोणताही खंड पडणार नाही. यावेळी पाद्यपूजा, तुळशी पूजा ,बंद राहणार आहे असे औसेकर महाराज यांनी सांगितले.**

मागील काही दिवसांपूर्वीच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे संवर्धनाचे काम सुरु झाले आहे. या कामी राज्य सरकारने निधी उपलब्ध करून दिला आहे . शासनाच्या पुरातत्व विभागाने मंदिरात नव्याने केलेले बांधकाम, ग्रेनाईट फरशी, टाईल्स, लाईट फिटिंग, दर्शन रांग,ऑईल पेंट काढून मंदिराचे मूळ स्वरूप , पुरातन काळातली रूप प्राप्त करून देणार आहे. मंदिर संवर्धन या कामाचे भूमिपूजन कार्तिकी एकादशीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले होते. आणि मंदिरातील महालक्ष्मी मंदिर आणि बाजीराव पडसाळी येथील काम सुरु झाले आहे.



१५ मार्चपासून श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या गर्भ ग्रहाचे म्हणजेच गाभाऱ्याचे काम करायचे आहे. यामध्ये गाभाऱ्यातील ग्रेनाईट फरशी, ऑईल पेंट,सिंमेट काढून त्या ठिकाणी मंदिराचे मूळ रूपात आणून दुरुस्ती करावयाची आहे. त्यासाठी दर्शनाला येणाऱ्या भाविकांना वारकऱ्यांना याचा त्रास होऊ नये तसेच आषाढी एकादशी पूर्वी हे काम पूर्ण होणे गरजेचे आहे आणि म्हणून आषाढी वारी पूर्वी काम पूर्ण करण्यासाठी तसेच ठरलेल्या वेळेत कामे पूर्ण म्हणून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, वारकरी, महाराज मंडळी, जिल्हाधिकारी यांची बैठक येथील भक्त निवास येथे पार पडली.

**भाविकांची दर्शनाची सोय :** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृहाचे कामासाठी पदस्पर्श दर्शन ४५ दिवस बंद करायचे ठरले असून हा काळ गर्भगृहाचे काम होण्यास अपेक्षित धरला आहे या कालावधीमध्ये वाढ होऊ शकते तसेच चैत्र वारीमध्ये पंचमी ते पौर्णिमेपर्यंत पहाटे ते संध्याकाळपर्यंत भाविकांची दर्शनाची सोय केली जाणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृह काम करत असताना या सर्व कामकाजाचे व्हिडिओ शूटिंग केले जाणार आहे तसेच हे व्हिडिओ शूटिंग जतन करून ठेवले जाणार आहे तसेच गर्भगृह चे काम करत असताना संपूर्ण श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तीला बुलेटप्रूफ काचेचे आवरण तयार करून त्यात एक कॅमेरा बसवला जाणार आहे.

**- गहिनीनाथ महाराज औसेकर,**
सह अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर